नांदेड जिल्ह्याचा क्रीडा संस्कृती व तिचे संवर्धन करणारे विविध घटक आणि समस्यांचा : चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

शारीरिक शिक्षणशास्त्र विद्याशाखा अंतर्गत शारिरिक शिक्षण विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा संशोधन आराखडा

:: संशोधक ::

श्री. शरद बालासाहेब इंगळे

श्री. दत्त माध्यमिक विद्यालय, नायगाव (बा)

ता. नायगाव (खै) जि. नांदेड

मो.क्र. ९१३०३०६०७५, sharadingale30@gmail.com

:: मार्गदर्शक ::

डॉ. साहेब गंगाराम मोरे

सहाय्यक प्राध्यापक, वसंतराव नाईक महाविद्यालय,

वसरणी, नविन नांदेड (महाराष्ट्र)

मो.क्र. ९८६०११७७१७

संशोधन केंद्र

किडा संकुल स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (महाराष्ट्र)

२०२३

नांदेड जिल्ह्यातील क्रिडा संस्कृती व तिचे संवर्धन करणारे विविध घटक आणि समस्यांचा : चिकित्सक अभ्यास

- **प्रस्तावना**
- **विषयाची निवड व पार्श्वभूमी**
- **समस्या सूत्रण**
- **संशोधनाचे महत्त्व**
- **संशोधनाचे गृहितके**
- **संशोधनाचे क्षेत्र**
- **नमूना निवड**
- **संशोधन पध्दती**
- **संशोधन आराखडा :**

प्रथम 1 ले : प्रस्तावना

प्रकरण 2 रे : संबंधित सहित्याचा आढावा

प्रकरण 3 रे : नांदेड जिल्ह्याचा सामान्य परिचय

प्रकरण 4 थे : नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्राचे संवर्धन करणारे विविध घटक

प्रकरण 5 वे : माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण 6 वे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

- **संदर्भग्रंथ सूची**

- **प्रस्तावना (Introducation) :**

भारतात क्रिडा संस्कृतीची परंपरा प्राचीन काळापासून आहे. विविध क्रिडा प्रकारातील विविध खेळ व शारीरिक शिक्षणाची परंपरा एक संस्कृती म्हणून रामायण व महाभारतामध्ये सुध्दा पहावयास मिळते. समाजासाठी व राज्याच्या उन्नतीसाठी खेळ किंवा क्रिडा संस्कृती एक प्रकारची जगण्याची प्राचीन परंपरा म्हणून अभ्यासली गेली आहे. प्राचीन काळामध्ये आश्रम व्यवस्थेद्वारा मोठे–मोठे गुरूकूल निर्माण करूण युवकाना अध्यात्मीक शिक्षणाबरोबरचं विविध क्रिडा प्रकाराचे सुध्दा शिक्षण दिले जात आसे. यासाठी त्याकाळातील मोठे–मोठे आश्रम हीच क्रिडा संस्कृतीचे संवर्धन करणारे घटक म्हणून कार्यरत होती. या आश्रमातून धर्म ज्ञान, संस्कार आणि शारीरिक शिक्षणाद्वारे विविध क्रिडा प्रकाराचे शिक्षण सुध्दा दिले जात असे. याचे उदाहरण आपल्याला रामायण व महाभारतात पहावयास मिळतात. त्याकाळी शरीर सुधरूढ, बलवान व आकर्षक बनविणे या सोबत मल्लविद्या, घोडेस्वारी, तलवारबाजी, धनुर्विद्या, भालाफेक आसे विविध क्रिडा खेळ म्हणून जोपासले जात असत. ती आपली क्रिडा संस्कृती म्हणून.

काळाच्या बदलानुसार क्रिडा प्रकारात आणि क्रिडा संस्कृती मध्ये वैश्विकस्तरानुसार भारतात ही बरासचा बदल झाला. स्वातंत्र्योत्तर काळात खेळ व शारीरिक शिक्षणाचा विकास गतीमान पध्दतीने झाला. तिच प्रगती ब्रिटिशांच्या राजवटीत सुध्दा कायम होती. पण त्याला काही मर्यादा होत्या. कारण त्यांच्या काळात सैनिक शिक्षण व युध्द–निती यावर जास्त भर होता. तेव्हा शारीरिक स्वास्थाकडे त्यांचे लक्ष जास्त असल्याने व्यायाम, कवायत, आहार अशा अनेक गोष्टी त्यांनी आपणास अवगत करून दिल्या असे म्हणावयास हरकत नाही. पश्चिमात्य देशात या विषयास फार मोठे स्थान दिलेले आहे. कारण कोणत्याही शिक्षण शाखेचा शास्त्रीय अभ्यास

केल्याशिवाय त्या विषयाची प्रगती फारशी पध्दतशीर होत नाही. आपण खेळ किंवा क्रिडा संस्कृतीच्या संवर्धनाच्या दृष्टि ने आज ही मागेच आहोत. आज भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष पूर्ण झाली तरीही खेळ किंवा क्रिडा शिक्षण व तिचे संवर्धन करणाऱ्या घटकांचा विकास म्हणावा तेवढा झाला नाही. परिणामी ऑलोम्पीक सारख्या जागतीक क्रिडा स्पर्धेमध्ये भारतासारख्या विशाल लोकसंख्या आसणाऱ्या देशाला बोटावर मोजण्या इतके पदके मिळतात. परंतु आर्थिक आणि लोकसंख्येने कमकूवत आसलेल्या देशाना आपल्यापेक्षा अधिक पदके मिळतात. कारण त्या देशाने क्रिडा संस्कृतीने संवर्धन व क्रिडा क्षेत्रातील विविध घटकाचा विकास केलेला दिसून येते. भारताच्या बाबतीत हे आपल्याला पहावयास मिळत नाही.

आज भारताकडे युवकाचा देश म्हणून वैश्विक पटलावर पाहिले जाते. परंतु क्रिडा क्षेत्रामध्ये भारताचे हे क्रिडा संस्कृतीचे संवर्धन प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत गांभीर्याने केले गेले नाही. म्हणून फक्त महानगरातील युवक किंवा तयणांची ओढ ही क्रिडा क्षेत्राकडे आसते. यामध्ये छोटे–छोटे शहरांचा, ग्रामीण भागातील युवकाचा सहभाग फार कमी प्रमाणात मिळतो. तो ही अनेक समस्याचा सामना करून पहावयास मिळतो. भारतातील महाराष्ट्रामध्ये मराठवाडा हा क्रिडा क्षेत्राच्या दृष्टिने फार उदासिन प्रदेश म्हणून पाहिले जाते. फक्त मुंबई, पूणे, नागपूर या सारख्या महानगरामध्येच क्रिडा संस्कृतीचे संवर्धन करणारे घटक बलशाही आहेत. परंतु मराठवाड्यातील नांदेड सारख्या शहरामध्ये युवकांच्या मनात खेळाची आवड किंवा क्रिडा संस्कृतीचे फार मोठी परंपरा आसून ही पूरेश्या सोयी सुविधाच्या अभावामुळे ते मुख्य प्रवाहात येत नाहीत. आज घडीला नांदेड जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुक्यात प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत शारीरिक शिक्षणाचा तास किंवा विषय

शिकविला जातो. या शिवाय खाजगी एन.जी.ओ., सामाजिक संस्थाद्वारे विविध क्रिडा प्रकार शिकविले जातात आणि भव्य स्पर्धाही घेण्याची परंपरा अविरत पणे सुरू आहेत. नांदेड जिल्ह्यातील विविध सरकारी, निमसरकारी संस्था द्वारे जिल्ह्यातील खेळाडूमध्ये क्रिडा संस्कृतीचे संवर्धन करण्याचे कार्य केले जात आहेत. परंतु या विविध घटकाच्या, युवकांच्या विविध समसया सुध्दा आहेत. ज्यामुळे नांदेड जिल्हा क्रिडा क्षेत्राच्या दृष्टीने मागास जिल्हा म्हणून का आहे? नांदेड जिल्ह्यातील कोण कोणते घटक आहेस जे प्रमाणिकपणे क्रिडा संस्कृतीचे सवंर्धन करत आहेत? याबरोबरच नांदेड जिल्ह्यातील क्रिडा प्रशिक्षक, खेळाडू याच्या समस्याचा कोणत्या आहेत. यासाठीच प्रस्तुत संशोधनाचे प्रयोजन सदरील अभ्यासातून करावयाचे आहे.

- **विषयाची निवड व पार्श्वभूमी (Backgrond) :**

महाराष्ट्रातील 'नांदेड' हा जिल्हा क्रिडा शेत्रामध्ये मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद जिल्ह्याच्या तुलनेत मागास जिल्हा म्हणून गणला जातो. कारण कबड्डी, खोखो, योगा, थाळी फेक, भाला फेक, कुस्ती, क्रिकेट, व्युसो सारख्या असंख्ये खेळामध्ये याच माहनगरातील खेळाडूचा समावेश राज्य व देशाच्यापातळीपर्यंत होतो. परंतु नांदेड सारख्या ग्रामीण भागातील जिल्ह्यातील खेळाडूना पूरेशे मार्गदर्शन, प्रशिक्षण व विविध सुविधाच्या अभावामुळे आपली योग्यता शिध्द करता येत नाही. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ आणि महानगरपालिकेचे भव्य क्रिकेटचे मैदान आसून सुध्दा नांदेड जिल्ह्यात क्रिडा संस्कृतीचे प्रभाविपणे संवर्धन होताना दिसून येत नाही. ही फार मोठी शोकांतिका मी शारीरिक शिक्षण पदवीचे शिक्षण घेत असताना पाहत आहे. परंतु गेल्या दोन वर्षापूर्वी नांदेड जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याला महाराष्ट्र शासनाचा छत्रपति पुरस्कार मिळाल्यामुळे माझ्या हे लक्षात आले की क्रिडा क्षेत्रातील विविध घटकांनी प्रमाणिकपणे कार्य केल्यास नक्कीच

नांदेड सारख्या जिल्ह्यात सुध्दा यशस्वी खेळाडू आणि खेळ संस्कृती संवर्धन होऊ शकते यासाठी **'नांदेड जिल्ह्याची क्रिडा संस्कृती व संवर्धन करणारे विविध घटक आणि तिच्या समस्या : एक चिकित्सक अभ्यास'** संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

- **समस्या सुत्रण (Research Problem Formulation)** :

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात व छोट्या–छोट्या शहरामध्ये गुणवान व मेहनती खेळाडूची काही कमी नाही, परंतु योग्य मागदर्शन, योग्य मार्गदर्शक आणि सरकारी स्तरावरूण मिळणारी अपूरी आर्थिक व संधीच्या अभावामुळे नांदेड सारख्या जिल्ह्यामधील क्रिडा क्षेत्र हे मागासलेले दिसून येते. मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपुर सारख्या महानगरातील क्रिडा क्षेत्र हे विकासाच्या वाटेवर जाताना दिसून येतात. अशा परिस्थितीत नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्र मागास आसल्याची समस्या आज प्रकरशाने जाणवते. म्हणून नांदेड सारख्या जिल्ह्याला फार जूनी क्रिडा संस्कृतीची परंपरा आसताना सुध्दा नांदेड जिल्हा क्रिडा क्षेत्रात का मागास आहे? यथील तरूण व तरूणीमध्ये खेळाची आवड असताना सुध्दा योग्य संधी, मार्गदर्शन आणि मार्गदर्शक का मिळत नाहीत? तसेच संपूर्ण जिल्ह्यामध्ये सरकारी व निम्नसरकारी तसेच सामाजिक संस्थानाचे क्रिडा संस्कृतीचे संवर्धन करण्यास कोणकोणते अडथळे आहेत आशा विविध क्रिडा क्षेत्रासी निगडीत समस्याचा किंवा प्रश्नाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करावयाचा आहे.

- **संशोधनाचे महत्व (Singnificance) :**

समस्या सुत्रण संशोधनाकरीता निवडण्यापूर्वी जी समस्या सोडविणे का आवश्यक आहे व त्या समस्याचे समाधान ह्या क्षेत्रात उपयोगी पडेल याचे महत्व जाणुन घेणे कमप्राप्त आहे.

1. प्रस्तुत संशोधनाद्वारे महाराष्ट्रातील क्रिडा संस्कृतीचा अभ्यास करूण सध्या स्थितिची माहिती मिळविता येते.
2. नांदेड शहर व जिल्ह्याचा क्रिडा क्षेत्राच्या दृष्टीने अभ्यासकरून माहिती मिळविता येईल.
3. क्रिडा संस्कृतीचे संवर्धन करणारे कोणकोणते घटक आसतात याचा विस्ताराने अभ्यास करता येईल.
4. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक ते महाविद्यालयीन शैक्षणिक स्तरावरील क्रिडा क्षेत्राची सध्याची वास्तव स्थितिची माहिती जानुन घेणे.
5. सदरील संशोधनाद्वारे नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्रा अंतर्गत कोण कोणते क्रिडा प्रकार कशा पध्दतीने शिकविले जातात व त्यांच्या स्पर्धा कशा पध्दतीने घेतल्या जातात याचा अभ्यास केला जाईल.
6. नांदेड जिल्ह्यातील सरकारी आणि सामाजिक संस्थाद्वारे क्रिडाचे आयोजन व क्रिडा संस्कृतीचे संवर्धन कसे केले जाते याचा विस्ताराने अभ्यास केला जाईल.
7. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्रातील विविध समस्याचा शास्त्रीय अभ्यास सदरील संशोधनाद्वारे केला जाईल.
8. नांदेड जिल्ह्यातील विविध गटातील खेळाळू त्यांचे मार्गदर्शक आणि क्रिडा क्षेत्रांत काम करणाऱ्या सरकारी व सामाजिक संस्थाचा तथ्यात्मक अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये केला जाईल.

9. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्रातील विविध समस्या किंवा अडथळे दूर करण्यासाठी शास्त्रीय उपाययोजनाचा विस्ताराने अभ्यास कोल जाईल.

- **संशोधनाचे उद्देश्य (Objective of the study) :**

1. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्रातील विविध घटकाचा व त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रात इतर प्रमुख जिल्ह्याच्या तुलनेने नांदेड जिल्हा क्रिडा क्षेत्रात का मागासलेला आहे या कारणाचा शोध घेणे.
3. नांदेड जिल्ह्यातील सरकारी व सामाजिक संस्थाचा क्रिडा क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.
4. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक ते महाविद्यालयी शालेय स्तरावरील क्रिडा क्षेत्रातील वर्तमान स्थिती व परिस्थितीचा अभ्यास करणे.
5. नांदेड जिल्ह्यातील विविध गटातील खेळाडू मार्गदर्शक व स्पर्धा घेणाऱ्या संस्थाचा वास्तव अभ्यास करणे.
6. नांदेड जिल्ह्यातील खेळाडू, मार्गदर्शक, शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठ या क्रिडा क्षेत्रातील घटकाचा अभ्यास करणे.

- **संशोधनाचे गृहितके (Research Hypotheses) :**

1. क्रिडा क्षेत्राच्या संवर्धनाच्या दृष्टीने नांदेड जिल्ह हा इतर प्रमुख जिल्ह्याच्या तुलनेने मागस जिल्हा म्हणून ओळखला जातो.
2. नांदेड जिल्हा हा ग्रामीण भागातील खेळाडूचा जिल्हा आहे. त्यामुळे खेळाडूंना व क्रिडा क्षेत्रातील सर्वच घटकांना अनेक समस्यांना समोर जावे लागते.
3. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्र सरकारी मदतीच्या अभावामुळे मागास असलेले दिसून येते.

4. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा संस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या विविध घटकाना शासनाची अपूरी मिळणारी आर्थिक मदत ही क्रिडा क्षेत्रातील विकासात मोठा अडथळा माणला जातो.
5. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा संस्कृतीचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने विविध सरकारी व सामाजिक घटकाची उदासिनता दिसून येते.
6. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी खेळाडूना, मागर्दशकाना योग्य वेळी संधी मिळत नसल्यामूळे क्रिडाक्षेत्राचे नुकसान होताना दिसून येते.
7. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक ते महाविद्यालय शालेय स्तरावरील क्रिडा साहित्याचा अभाव, मार्गदर्शकांचा अभाव आणि एकूणच याची उदासिनता यामुळे गुणवान खेळाडू निर्माण करू शकत नाहीत.
8. अशा विविध क्रिडा क्षेत्रातील समस्याचा सामना करीत विविध घटकातील खेळाडू नांदेड जिल्ह्यातील क्रिडा संस्कृतीची जोपासना करताना दिसून येतात.

- **संशोधन क्षेत्र (Fleld of Research) :**

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्याचे वर्तमान क्रिडा क्षेत्र आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक ते महाविद्यालयीन शालेय स्तरावरील खेळाडू, मार्गदर्शक, शाळा, महाविद्यालय तसेच सरकारी व सामाजिक संस्था यांचा अभ्यास सदरील संशोधनात क्रिडा संस्कृतीचे संवर्धन व अडथळे याचा विस्ताराने तथ्यात्मक अभ्यास करण्यासाठी या क्षेत्राची निवड करण्यात आली आहे.

- **नमूना निवड (Research Sample selection) :**

प्रस्तुत संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्राचे संवर्धन करणारे विविध घटकाचा आणि त्यांच्या समस्याचा अभ्यास करीत असताना सहेतूक नमूना निवड पध्दतीने नांदेड जिल्ह्यातील एकूण 16 तालुक्यापैकी

6 प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा आणि 16 महाविद्यालय क्रिडा स्थितीचा अभ्यास केला जाईल. तसेच सरकारी अधिकारी व सामाजिक संस्थाचा क्रिडा संवर्धनाच्या दृष्टीने अभ्यासाबरोबरच त्याच्या समस्याचा अभ्यास मुलाखतीच्या द्वारे योग्य प्रश्नावली तयार करूण केला जाईल.

- **संशोधनाच्या मर्यादा (Range of Research) :**

सदरील संशोधन हे योग्य मर्यादा व सीमामध्ये राहूनच यशस्वी करण्यासाठी खालील मर्यादा येतात.

1. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्राचा अभ्यास करावयाचा आहे.
2. नांदेड जिल्ह्यातील विविध शाळा महाविद्यालयाबरोबरच सरकारी व सामाजिक संस्थाचा अभ्यास क्रिडा क्षेत्राच्या संदर्भाने केला जाईल.
3. नांदेड जिल्ह्यातील विविध सरकारी बिगर सरकारी सामाजिक संस्थाचा क्रिडा विषयक क्षेत्रातील डाटा याचा अभ्यास केला जाईल.
4. नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्रातील संबंधित शहरी व ग्रामीण खेळाडू, मार्गदर्शक, क्रिडा संचालक व क्रिडा महोस्वाचे आयोजक यांच्या मुलाखती घेवून सांखिकीय पध्दतीने माहितीचे विश्लेषण केले जाईल.

संशोधन आराखडा :

प्रकरण 1 ले – प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधनातील पहिल्या प्रकरणात सदरील विषयानुसार विषय प्रवेश करून, संशोधनाचे महत्व, उद्देश्य, गृहितके, समस्या सूत्रण, संशोधन क्षेत्र, संशोधनाच्या मर्यादा, संशोधन पध्दतीचा विस्ताराने अभ्यास केला जाईल.

प्रकरण 2 रे – संबंधित साहित्याचा संक्षिप्त आढावा :

सदरील संशोधनाच्या संदर्भाने उपर्युक्त असे साहित्याचा संक्षिप्त आढावा या प्रकरणात करण्यात येईल. नांदेड शहरातील विविध ग्रंथालयातील मानक ग्रंथाचा, पत्र पत्रिकाचा, वर्तमान पत्राचा व विविध सरकारी व सामाजिक संस्थाच्या अभ्यासात्मक अहवालाचा विस्ताराने अभ्यास केला जाईल.

प्रकरण 3 रे – नांदेड जिल्ह्याचा सामान्य परिचय :

प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यासी संबंधीत आसल्यामुळे नांदेड जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, लोकसंख्या, संस्कृती, महाविद्यालय विविध शाळेचा अभ्यासा बरोबरचं नांदेड जिल्ह्यातील क्रिडा संस्कृतीचा संक्षिप्त अभ्यास सदरील प्रकरणात केला जाईल.

प्रकरण 4 थे – नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्राचे संवर्धन करणारे विविध घटक :

सदरील प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्यातील विविध घटकाचा अभ्यास केला जाईल. ज्याचा क्रिडा क्षेत्रातील संवर्धनासाठी प्रत्येक्ष व अप्रत्यक्ष सहभाग आहे. ज्यामध्ये विविध शाळा, महाविद्यालय, सरकारी व सामाजिक संस्थाचा तथ्यात्मक अभ्यास केला जाईल.

प्रकरण 5 वे – माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्यातील विविध सरकारी व सामाजिक संस्थाचे क्रिडा क्षेत्राच्या संदर्भाने विविध अहवाल यांचा अभ्यास करण्याबरोबरच नांदेड जिल्ह्यातील विविध गटातील खेळाडू, मार्गदर्शक, महाविद्यालय व शाळेस्तरावरील संचालक आणि सरकारी व सामाजिक

संस्थाचे संचालक यांच्या माहितीचे सांखिकी विश्लेषण करूण त्याचे तथ्यात्मक अर्थनिर्वचन केले जाईल.

प्रकरण 6 वे – सारांश, निष्कर्ष व शिफारशी :

सदरील संशोधनाच्या शेवटच्या प्रकरणात संशोधनाच्या दृष्टीने प्रकरण 1 ते 5 मध्ये मांडलेल्या तथ्यात्मक बाबीचा आढावा संक्षिप्त स्वरूपात मांडण्यात येईल. तसेच सदरील संशोधनाचे उद्देश्य, गृहितके यांची पडताळणी अनुभवाच्या आधारावर विश्लेषित केली जाईल. व शेवटी नांदेड जिल्ह्यातील क्रिडा क्षेत्राच्या संवर्धनासाठी तथ्यात्मक पध्दतीने शिफारसी मांडल्या जातील.

- **संदर्भग्रंथ सूची (References Books) :**

1. जर्दे श्री आणि जर्दे सु., शारीरिक शिक्षणाचे स्वरूप, पूणे चंद्रमा प्रकाशन, 1991.
2. प्रा. शंकर तिवाडी, शारीरिक शिक्षण मापन व मूल्यमापन.
3. डॉ. एच.ए. माने, शैक्षणिक व शारीरिक संशोधन, विजय प्रकाशन,नांदेड–2006.
4. डॉ. प्रदीप आगलावे, संशोधन पध्दती.
5. बिसवास फोनेभूषण, शारीरिक शिक्षण, 2022.
6. डॉ. अनिल शर्मा, शारीरिक शिक्षा एवं आहार प्रबंध.
7. Dr. Pradeep Deshmukh, Reacharch methodology and physical Education-2008.
8. Dr. Chakraborty, Sports psychology behavior, motivation and Emotion-2008.
9. Dr. Aneja, Fitness performance and Health-2012.
10. Distick of Gazeet in Nanded-2010.
11. श्री अशोक बगाडिया, नांदेड जिल्ह्याची सम्पूर्ण माहिती, 2006.

मार्गदर्शक

डॉ. साहेब गंगाराम मोरे

सहाय्यक प्राध्यापक, वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नविन नांदेड (महाराष्ट्र)

संशोधक

श्री. शरद बालासाहेब इंगळे

श्री. दत्त माध्यमिक विद्यालय, नायगाव(बा) ता. नायगाव (खै) जि. नांदेड